नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १०८ Issue - 108 | वार - शनिवार दि. १२ सप्टेंबर २०२६ Blow- Saturday Date 12 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## महाराष्ट्रात पावसाचे पुनरागमन

### बहुतांश जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून पावसाने काहीशी विश्रांती घेतली होती. मात्र आता राज्यातील हवाम ानात पुन्हा बदल होण्यास सुरुवात झाली असून पावसासाठी पोषक हवामान प्रणाली सक्रिय झाली आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवस राज्यातील विविध भागांत पावसाचा अंदाज वर्तवला आहे. १२ सप्टेंबर रोजी राज्यातील बहुतांश भागांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला असून, काही ठिकाणी हलका ते मध्यम तर काही भागांत जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. यासोबतच वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटाचीही शक्यता आहे. (चरहरीरीहीर थशरींहशी णविरींश)



कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात ३० ते ४० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून, विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम आणि काही ठिकाणी जोरदार पाऊस पडू शकतो. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी कोणताही अलर्ट नसला तरी काही ठिकाणी हलक्या सरींची शक्यता आहे.

उत्तर महाराष्ट्रात जोरदार पावसाची शक्यता

उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर, नाशिक आणि नाशिकच्या घाटमाथा परिसरातही यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात ४० ते ५० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याचा अंदाज असून काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. दरम्यान, धुळे आणि नंदुरबारसाठी पुढील दिवशी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, पुणे घाटम ाथा आणि सोलापूरसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोल्हापूर, सात-ारा आणि सांगलीला अलर्ट नसला तरी काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस आणि वादळी वाऱ्यांची शक्यता आहे. काही भागांत जोरदार ते मुसळधार पाऊस होण्याचा अंदाजही आहे.

विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांनाही यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात ४० ते ५० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून, विजांच्या कडकडाटासह हलका ते जोरदार पाऊस पडू शकतो.

विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वाशिम, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांतही जोरदार ते म ुसळधार पावसाचा अंदाज आहे. या भागात ४० ते ५० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

एकूणच, राज्यात पुन्हा पावसाला सुरुवात होण्याची शक्यता असून पुढील दोन दिवस अनेक भागांत पावसाच्या सरी पाहायला मिळू शकतात. त्यामुळे काही दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने पुन्हा हजेरी लावल्याने नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

## संभाजी ब्रिगेडने एमपीएससी सचिवांना कार्यालयात घुसून काळं फासलं

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबईत : राज्यातील पेपरफ ुटीवरुन विद्यार्थ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून एमपीएस-सी विद्यार्थ्यांनी पुण्यात मोर्चाही काढला होता. या आंदोलनात विरोधी पक्षातील नेतेही सहभागी झाले होते, शासनाने एमपीएससी अध्यक्षांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात आली. त्यानंतर, सरकारनेही भूमिका स्पष्ट करत, पेपरफुटीत जे जे दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करू, असा इशारा दिला. एकीकडे कारवाई सुरू असतान आज संभाजी ब्रिगेडने एमपीएससीच्या सचिवांना काळे फासल्याची घटना घडली. या घटनेनंतर आता गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आंदोलकांना इशारा दिला आहे.

नवी मुंबईतील चझडउ कार्यालयात एमपीएससीच्या सचिवांना संभाजी ब्रिगेडकडून काळ फासण्यात आलं. त्यावर, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी प्रतिक्रिया देताना संभाजी ब्रिगेडवर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. सचिवांच्या कार्यालयात





### गृहराज्यमंत्री योगेश कदमांकडून कारवाईचा इशारा

जाऊन त्यांना काळे फासल्याच्या घटनेवर योगेश कदम यांनी भाष्य केलं. तुम्ही अशा प्रकारचे आंदोलन करून प्रसिद्धी मिळव-तात, पण प्रश्न सुटणार नाही. एमपीएससी प्रकरणात जे जे दोषी असतील त्यांच्यावर सरकार कारवाई करणार आहे. आम्ही प्रकरण गांभीर्याने घेतलं आहे. तरीदेखील राज्यात कायदा व सुव्यवस्था अशा आंदोलनामुळे निर्माण झाली त्याची खबरदारी घेतली जाईल, असे गृहराज्यमंत्री योगेश कदम म्हणाले. धाराशिवम ध्ये योगेश कदम यांनी पत्रकारांशी बोलताना भूमिका मांडली.

दरम्यान, संभाजी ब्रिगेडने सचिवांच्या तोंडाला काळं फासलं असून चझडउ चा अभ्यास करणाऱ्या २५ लाख विद्यार्थ्यांच्या व महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेच्यावतीने संभाजी ब्रिगेडने या भ्रष्ट व्यवस्थेच्या आणि नालायक सरकारच्या तोंडाला काळं फासल्याची प्रतिक्रिया दिली. महेंद्र हरपाळकरच्या जी थोबाडीत मारली आहे ती या सरकारला जनतेच्यावतीने संभाजी ब्रिगेडने मारलेली थप्पड आहे, अशी प्रतिक्रिया संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्राचे प्रवक्ते संतोष शिंदे यांनी दिली.

## गणेशोत्सवासाठी रेल्वेचा मोठा दिलासा; ३८६ गणपती विशेष गाड्या जाहीर, कोकणासाठी ४ अतिरिक्त गाड्यांची भर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आगामी गणेशोत्सवाच्या काळात प्रवाशांची होणारी गर्दी आणि सोय लक्षात घेता रेल्वे प्रशासनाने म ोठा निर्णय घेतला आहे. दिनांक १४ सप्टेंबर २०२६ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत साजरा होणाऱ्या गणेशोत्सवासाठी रेल्वेने एकूण ३८६ गणपती विशेष गाड्यांची घोषणा केली आहे. यामध्ये मध्य रेल्वेच्या २५८, पश्चिम रेल्वेच्या ६४, कोकण रेल्वेच्या ५८ आणि दक्षिण मध्य रेल्वेच्या ६ विशेष गाड्यांचा समावेश आहे. तसेच, मध्य रेल्वेने ८ सप्टेंबर २०२६ पासून मुंबई ते सावंतवाडी रोड दरम्यान एक नवीन दैनंदिन एक्सप्रेस गाडीही सुरू केली आहे.

कोकणासाठी ४ अतिरिक्त अनारक्षित विशेष गाड्या

गणपती विशेष गाड्यांच्या भागात प्रवाशांची वाढती मागणी पाहता, मध्य रेल्वेने मुंबई आणि सावंतवाडी रोड दरम्यान ४ अतिरिक्त अनारक्षित विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे:



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - सावंतवाडी रोड (गाडी क्र. ०१००९): ही गाडी दिनांक १२.०९.२०२६ आणि १३.०९.२०२६ रोजी उडचढ वरून दुपारी १३.४५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ०३.०० वाजता सावंतवाडी रोड येथे पोहोचेल (एकूण २ सेवा).

सावंतवाडी रोड - छत्रपती शिवाजी महार-ाज टर्मिनस (गाडी क्र. ०१०१०): ही गाडी दिनांक १३.०९.२०२६ आणि १४.०९.२०२६ रोजी सावंतवाडी रोड येथून पहाटे ०४.०५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी सायंकाळी १८.१५ वाजता उडचढ येथे पोहोचेल (एकूण २ सेवा).

महत्त्वाचे थांबे आणि डब्यांची रचना-या विशेष गाड्या दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माण-गाव, वीर, करंजडी, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजा-पूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ आणि झाराप या स्थानकांवर थांबतील. या गाड्यांच्या संरचनेत १२ शयनयान, ६ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ द्वितीय आसनासह गार्ड्स ब्रेक व्हॅन असणार आहेत.

तिकीट बुकिंग आणि सुविधा

सामान्य दरांसह अनारक्षित डब्यांचे आरक्षण युटीएस प्रणालीद्वारे केले जाऊ शकते. तसेच तिकीट बुकिंगसाठी प्रव-ासी 'रेलवन' ॲप देखील डाउनलोड करू शकतात. गाड्यांच्या थांब्यांवरील वेळेच्या सविस्तर माहितीसाठी छर-ींळेपरश्र ढीरळप एपर्िीळू ड्रीींशा (छढएड) ला भेट देऊ शकता किंवा एनटीईएस प डाउनलोड करू शकता.

प्रवाशांसाठी रेल्वेचे महत्त्वाचे सुर-क्षा आवाहन

उत्सवाच्या काळात स्थानकांवर आणि गाड्यांमध्ये होणारी गर्दी लक्षात घेता प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आरपीएफ, जीआरपी आणि शहर पोलिसांमार्फत व्यापक व्यवस्था करण्यात आली असून रेल्वेने प्रवाशांना खालील काळजी घेण्याचे आव-ाहन केले आहे: कोणतीही अनोळखी किंवा वारसदार नसलेली बॅग, पार्सल व वस्तूंना स्पर्श करू नका. आपले सामान प्लॅटफॉर्मवर, गाड्यांमध्ये किंवा पादचारी पुलांवर विना-देखरेख सोडू नका. गर्दी करणे, फूटबोर्डवरून प्रवास करणे आणि धावत्या गाड्यांमध्ये चढणे किंवा उतरणे टाळा. संशयास्पद हालचाल किंवा वस्तू आढळल्यास तात्काळ जवळच्या आरपीएफ/जीअ-ारपी कर्मचाऱ्याला किंवा सुरक्षा हेल्प-लाइन क्रमांक १३९ वर संपर्क साधा.

### शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचे निर्देश

### जिल्हास्तरीय धर्मादाय रुग्णालय देखरेख समितीची बैठक

## गरजू रुग्णांना उपचारापासून वंचित ठेवू नका; धर्मादाय रुग्णालयांत डिजिटल दरपत्रक बंधनकारक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : जिल्ह्यातील गरीब व दुर्बल घटकातील एकही रुग्ण वैद्यकीय उपचारांपासून वंचित राहण-ार नाही, याची दक्षता सर्व धर्मादाय रुग्णालयांनी घ्यावी. तसेच प्रत्येक धम ार्दाय रुग्णालयाने रुग्णालयाच्या दर्शनी भागात उपचारांचे डिजिटल दरपत्रक लावणे बंधनकारक असून, त्याचा जिओटॅग अहवाल एका महिन्यात प्रशासनाकडे सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हास्तरीय धर्मादाय रुग्णालय देखरेख समितीची बैठक जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात झाली. त्यावेळी ते मार्गदर्शन करत होते. बैठकीस धर्मादाय उपायुक्त ईश्वर सूर्यवंशी, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार राजेंद्र राऊत, श्री. शहाजी पवार, डॉ. वैषंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, समिती सदस्य डॉ. संतोष आडके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी, आयुष्मान भारत योजनेचे जिल्हा समन्वयक प्रवीण गुंजाळ यांच्यासह जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयांचे विश्वस्त व प्रतिनिधी उप-स्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन म्हणाले की, धर्मादाय रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या गरीब व दुर्बल घटकातील रुग्णांना शासनाच्या विविध आरोग्य योजनांची योग्य माहिती मि ळणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक रुग्णालयात नियुक्त आरोग्यमित्रांनी गरजू रुग्णांना योजनांची माहिती देऊन त्यांना संबंधित योजनांचा लाभ मिळवून द्यावा.

प्रत्येक रुग्णालयाच्या दर्शनी भागात डिजिटल दरपत्रक लावल्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना उपलब्ध उपचारांचे दर स्पष्टपणे समजतील. त्यामुळे दरपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी. डिजिटल दरपत्रक लावल्याचा जिओटॅग अहवाल संबंधित रुग्णालयांनी एका महिन्याच्या आत प्रशासनाकडे सादर करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.




धर्मादाय रुग्णालयांकडे शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांनी सादर केलेली कागदपत्रे वैध आहेत किंवा नाहीत, याची खातरजमा रुग्णालयांनी करावी. रेशन कार्ड, उत्पन्नाचा दाखला तसेच इतर आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन व पडताळणीसाठी जिल्हास्तरावर लवकरच स्वतंत्र सेल स्थापन करण्यात येणार असून, या सेलच्या माध्यमातून आवश्यक माहिती घेता येईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

आरोग्य विभागाने जिल्ह्यातील धम ार्दाय रुग्णालयांची नियमित तपासणी करावी. शासकीय योजनांतर्गत उपच-ार घेणाऱ्या रुग्णांना रुग्णालयाकडून योग्य पद्धतीने उपचार मिळत आहेत का, दर्शनी भागात डिजिटल दरपत्रक लावण्यात आले आहे का, आरोग्यमित्र उपलब्ध आहे का, आरोग्यमित्राकडून रुग्णांना योजनांची योग्य माहिती दिली जाते का, तसेच रुग्णालयात आवश्यक वैद्यकीय साहित्य व सुविधा उप-लब्ध आहेत का, याची तपासणी करावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

या बैठकीस संबंधित धर्मादाय रुग्णालयांचे विश्वस्त किंवा सक्षम प्रतिनिधी उपस्थित राहणे अपेक्षित होते. मात्र, बैठकीस अनुपस्थित राहिलेल्या धर्मादाय रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

धर्मादाय उप आयुक्त ईश्वर सूर्यवंशी यांनी सांगितले की, सोलापूर जिल्ह्यात एकूण १८ धर्मादाय रुग्णालये असून, शासकीय योजनांच्या लाभार्थी रुग्णांसाठी ३५० खाटा आरक्षित आ-हेत.

राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या शासन निर्णयानुसार या सर्व धर्मादाय रुग्णालयांनी गोरगरीब व गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांना शासकीय योजनांची योग्य माहिती देणे आवश्यक आहे.

ज्या उद्देशाने शासनाने धर्मादाय रुग्णालयांना मान्यता दिली आहे, त्या उद्देशाची प्रभावी अंमलबजावणी करणे प्रत्येक रुग्णालयाचे कर्तव्य आहे. तसेच ज्या कारणासाठी रुग्णालयांना शासकीय जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे, त्या जागेचा वापर केवळ वैद्यकीय सेवा देण्यासाठीच करण्यात यावा. अन्य व्यावसायिक कारणांसाठी शासकीय जागेचा वापर होणार नाही, याची संबंधितांनी दक्षता घ्यावी, असे सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले.

यावेळी धर्मादाय रुग्णालयाचे विश्वस्त प्रतिनिधी यांनीही शासकीय योजनेचा लाभ रुग्णांना देत असताना येणाऱ्या अडचणी विषयी बैठकीत माहिती दिली.

### रुग्णालयांनी मासिक अहवाल सादर करावा : आमदार सचिन कल्याणशेट्टी

**आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सर्व धर्मादाय रुग्णालयांनी दर म हिन्याला उपचार व शासकीय योजनांच्या लाभार्थी रुग्णांबाबतचा अहवाल सादर करावा, अशी सूचना केली. बैठकीत संबंधित रुग्णालयांचे विश्वस्त व प्रतिनिधींनी आपल्या रुग्णालयातील कामकाजाची सविस्तर माहिती द्यावी. गरीब व गरजू रुग्णांना केवळ कागदपत्रांच्या अडचणींमुळे उपचारापासून वंचित ठेवू नये. अशा रुग्णांना आवश्यक ते उपचार तातडीने उपलब्ध करून द्यावेत, असेही त्यांनी सांगितले. आमदार राजेंद्र राऊत यांनीही धर्मादाय रुग्णालयांनी रुग्णांना वेळेत आणि कोणतीही तक्रार निर्माण होणार नाही अशा पद्धतीने उपचार उपलब्ध करून द्यावेत. शासकीय आरोग्य योजनांचा लाभ घेण्यास पात्र असलेला एकही रुग्ण या लाभापासून वंचित राहणार नाही, याची रुग्णालयांनी काळजी घ्यावी, असे सांगितले.**

## संपादकीय....

## ऐतिहासिक पाऊल

ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची शुक्रवारी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे द्विपक्षीय बैठक पार पडली. ब्रिक्स शिखर परिषद २०२६ च्या एक दिवस आधी दोन्ही राजनेत्यांमध्ये ही बैठक झाली असून भारत आणि रशिया यांच्यातील आर्थिक संबंध अधिक दृढ करण्यावर या बैठकीत लक्ष केले गेले. २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट दोघांच्या बैठकीतील महत्त्वाचा मुद्दा राहिला. तसेच औद्योगिक सहकार्य, अणुऊर्जा, कुशल भारतीय कामगार, महत्त्वपूर्ण खनिजे आणि खतांचा पुरवठा यांसारख्या मुद्द्यांवरही चर्चा झाली. भारत आणि रशियाने द्विपक्षीय व्यापार व्यवहारांसाठी अशी यंत्रणा विकसित करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे, ज्यामुळे डोनाल्ड ट्रम्प नक्कीच आणखी चिडतील. दोन्ही देशांमधील व्यापार वाढवण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून, द्विपक्षीय व्यापार व्यवहारांसाठी डिजिटल चलन वापरण्याची यंत्रणा विकसित करण्यावर दोन्ही देश काम करत असून यामुळे सीमापार पेमेंटमध्ये गती आणि कार्यक्षमतेसाठी नवीन पर्याय मिळू शकेल. त्याचवेळी, भारत आणि रशियाची द्विपक्षीय व्यापार डिजिटल चलनाच्या माध्यमातून पूर्ण करण्याची योजना डॉलरमुक्तीच्या दिशेने मोठे आणि ऐतिहासिक पाऊल असेल. रशियातील सर्वात मोठी बँक स्बरबँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हर्मन ग्रेफ यांनी सांगितले की, रशियाची मध्यवर्ती बँक आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया या व्यवस्थेवर काम करत आहेत. तसेच दोन्ही देश द्विपक्षीय व्यापारातील पेमेंट-संबंधित समस्या कमी करण्याचा आणि आर्थिक संबंध अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करत असताना उपक्रम हाती घेतल्याचेही ब्लूमबर्गने आपल्या अहवालात दावा केला. रशियाने १ सप्टेंबर रोजी सरकारी मालकीच्या स्बरबँकेसह प्रमुख बँकांमार्फत आपले मध्यवर्ती बँकेचे डिजिटल चलन, 'डिजिटल रुबल', लाँच केलेले तर भारताने २०२२ मध्ये प्रायोगिक तत्त्वावर डिजिटल चलन सुरू केलेले, ज्याचा वापर आता काही सरकारी कार्यक्रमांमध्ये केला जात आहे. भारत-रशिया संबंध आता केवळ संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रापुरते मर्यादित राहिलेले नाही तर दोन्ही देश उद्योग, आयटी, पुरवठा साखळी, अणुऊर्जा आणि महत्त्वपूर्ण खनिजे यांसारख्या नवीन क्षेत्रांमध्येही भागीदारी वाढवू पाहत आहेत.

# माधुरीची घरवापसी : एका हत्तीणीची कहाणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर जिल्ह्यातील शिराळ तालुक्यातील नांदणी गावातील जैन मठाशी अनेक दशकांपासून जोडलेली माधुरी उर्फ महादेवी हत्तीण पुन्हा नांदणीकडे परतत आहे. तिच्या घरवापसीमागे वर्षभराहून अधिक काळ चाललेली न्यायालयीन प्रक्रिया, लोकांचे आंदोलन, वैद्यकीय उपचार, प्रशासकीय पाहणी आणि पुनर्वसनाची तयारी आहे. त्यामुळे माधुरीचे प्रकरण केवळ एका हत्तीणीच्या स्थलांतराचे नसून माणूस आणि प्राणी यांच्यातील भावनिक नाते, प्राणी कल्याण आणि सामाजिक सहभाग यांची कहाणी आहे.

२०२५ ते २०२६ : माधुरीच्या घरवापसीचा प्रवास

१६ जुलै २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने माधुरीला नांदणीतील मठातून गुजरातमधील जामनगर येथील वनतारामध्ये हलवण्याचा आदेश दिला. तिच्या आरोग्याची स्थिती, पाय-सांध्यांच्या समस्या आणि देखभालीबाबत उपस्थित झालेले प्रश्न या निर्णयामागे होते. या आदेशाला आव्हान देण्यात आले; मात्र २८/२९ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयीन प्रक्रियेनंतर माधुरीला वनतारात हलवण्याचा मार्ग मोकळा झाला.

या निर्णयामुळे नांदणीत तीव्र प्रतिक्रिया उमटली. २५ जुलैला नागरिकांनी मूक मोर्चा काढला आणि पुढे आंदोलन, उपोषण व पदयात्रेच्या माध्यमातून माधुरीला परत आणण्याची मागणी सुरू राहिली. तिच्याशी अनेक दशकांचे भावनिक नाते असल्यामुळे स्थानिक लोकांसाठी हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय बनला.

२९ जुलैच्या रात्री माधुरीला नांदणीहून गुजरातकडे रवाना करण्यात आले. तिच्या निरोपासाठी मोठी गर्दी झाली होती. रवानगीच्या वेळी तणाव निर्माण झाला आणि दगडफेकीत काही पोलिस कर्मचारी जखमी झाले. अखेर माधुरीला गुजरातच्या दिशेने रवाना करण्यात आले. ३० जुलैला ती वनतारामध्ये दाखल झाली.

वनतारा हे हॉस्पिटलचे नाव नसून जामनगरमधील प्राणी बचाव, उपचार, पुनर्वसन आणि संरक्षणाचे मोठे केंद्र आहे. तेथे हत्तींसाठी स्वतंत्र पशुवैद्यकीय सुविधा आहेत. माधुरीवर पाय व सांध्यांच्या समस्यांसाठी उपचार, वैद्यकीय तपासण्या, फिजिओथेरपी, हायड्रोथेरपी, योग्य आहार आणि मऊ पृष्ठभागावरील निवासव्यवस्था करण्यात आली. तिच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याचे वनताराकडून सांगण्यात आले.

दरम्यान, माधुरीला नांदणीला परत आणण्याची मागणी सुरूच राहिली. ऑगस्ट २०२५पासून या मागणीला अधिक वेग आला. वनताराकडूनही तिच्या परतीची तयारी दर्शवण्यात आली; मात्र नांदणीमध्ये तिच्यासाठी योग्य सुविधा असणे आवश्यक होते. त्यामुळे तिच्या निवास, सुरक्षा आणि वैद्यकीय गरजांसाठी नव्याने व्यवस्था उभारण्याची प्रक्रिया सुरू झाली.

२३ जून २०२६ रोजी संबंधित सरकारी आणि प्राणी कल्याण यंत्रणांच्या सहभागातून पुनर्वसनाची प्रक्रिया पुढे नेण्यात आली. १७ जुलैला नांदणीतील सुविधांची पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले आणि १० ऑगस्टला संयुक्त समितीने प्रत्यक्ष नांदणीला भेट देऊन माधुरीसाठी तयार केलेल्या व्यवस्था तपासल्या. त्याचा अहवाल उच्चस्तरीय समितीकडे देण्यात आला.

अखेर ९ सप्टेंबर २०२६ रोजी माधुरीला नांदणीला परत आणण्यास परवानगी देण्यात आली. आवश्यक वाहतूक परवानगी आणि इतर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १० सप्टेंबरला माधुरी वनतारातून बंदिस्त वाहनाने नांदणीच्या दिशेने रवाना झाली. तिचे माहुतही या प्रक्रियेत सहभागी झाले.

नांदणीशी माधुरीचे नाते

माधुरीचा नांदणीतील जैन मठाशी सुमारे ३३-३४ वर्षांचा संबंध असल्याचे वृत्तांत सांगतात. ती मठाच्या मुख्य इमारतीत राहत नव्हती; तिच्यासाठी मठाच्या परिसरात स्वतंत्र व्यवस्था होती.

दीर्घकाळ एकाच ठिकाणी राहिल्यामुळे ती स्थानिक लोकांच्या जीवनाचा परिचित भाग बनली. धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांशी तिचा संबंध असल्याने तिच्याशी लोकांचे भावनिक नाते निर्माण झाले. त्यामुळे तिला दूर नेण्याचा निर्णय लोकांसाठी अत्यंत भावनिक ठरला आणि तिच्या परतीसाठी मोठे आंदोलन उभे राहिले.

वनतारातील उपचार आणि पुनर्वसन

वनतारामध्ये माधुरीला केवळ ठेवण्यात आले नव्हते; तिच्यावर विशेष वैद्यकीय उपचार करण्यात आले. तिच्या पाय आणि सांध्यांच्या समस्या लक्षात घेऊन तपासण्या, फिजिओथेरपी, हायड्रोथेरपी, योग्य आहार आणि आरामदायी निवासाची व्यवस्था करण्यात आली. तिच्या हालचालींमध्ये सुधारणा व्हावी आणि शारीरिक ताण कमी व्हावा यासाठी विशेष काळजी घेण्यात आली.

वनतारा हे रिलायन्स समूहाशी संबंधित असून अनंत अंबानी यांच्या पुढाकाराशी जोडलेले प्राणी पुनर्वसन केंद्र आहे. तेथे हत्तींसाठी स्वतंत्र एश्रशहिरपीं कीळिरिंश्र तसेच विविध निदान, उपचार आणि पुनर्वसन सुविधा उपलब्ध आहेत.

आता माधुरीचे जीवन कसे असेल?

माधुरी नांदणीला परतत असली तरी तिचे पूर्वीचे जीवन जसेच्या तसे सुरू होणार नाही. तिच्या आरोग्याला प्राधान्य देणे, चोवीस तास देखभाल करणे आणि नियमित वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे. तिचा मिरवणुका किंवा इतर सार्वजनिक उपयोगासाठी वापर करता येणार नाही.

म्हणजे ही केवळ 'घरवापसी' नसून नव्या अटींसह पुनर्वसनाची सुरुवात आहे.

वनताराची भूमिका येथे विशेष महत्त्वाची आहे. माधुरी नांदणीला परतल्यानंतरही वनताराचे पशुवैद्यकीय तज्ज्ञ नियमितपणे तिची तपासणी करतील आणि आवश्यकतेनुसार वैद्यकीय सहकार्य देतील. नांदणीतील तिच्या पुनर्वसनासाठी आवश्यक सुविधांमध्येही वनताराने सहकार्य केले आहे.

खर्च आणि किंमतीचा प्रश्न

माधुरीला जामनगरला नेणे, तेथे जवळपास वर्षभर तिची विशेष देखभाल व उपचार करणे आणि आता तिला नांदणीला सुरक्षितपणे परत आणणे यासाठी मोठा खर्च झाला असणार. मात्र माधुरीसाठी झालेल्या एकूण खर्चाचा अधिकृत आकडा जाहीर झालेला नाही.

सामान्य वाचकाच्या दृष्टीने एवढे लक्षात घेणे पुरेसे आहे की, हत्तीसारख्या मोठ्या प्राण्याची वर्षभर विशेष वैद्यकीय देखभाल हा मोठ्या खर्चाचा विषय आहे. हा खर्च आणि उपचारांची जबाबदारी वनताराने स्वीकारली, ही निश्चितच उल्लेखनीय बाब आहे.



हत्तीला सामान्य जनावराप्रमाणे ठरावीक बाजारभावही नसतो. तरीही प्रशिक्षित आणि दीर्घकाळ सांभाळलेल्या हत्तीचे आर्थिक मूल्य मोठे असते. माधुरीसाठी साधारण एक कोटी रुपयांच्या आसपासचे मूल्य हा केवळ अंदाज म्हणून विचारात घेता येईल. मात्र तिचे खरे मूल्य पैशात मोजता येणार नाही; नांदणीच्या लोकांशी निर्माण झालेले तिचे अनेक दशकांचे नाते अधिक महत्त्वाचे आहे.

या कहाणीचा खरा अर्थ

माधुरीचे प्रकरण आपल्याला एक महत्त्वाचा धडा देते. एखाद्या प्राण्याच्या आरोग्यासाठी अत्याधुनिक उपचार आणि सुविधा आवश्यक असतात; पण त्याचवेळी त्या प्राण्याशी अनेक वर्षे जोडलेल्या समाजाच्या भावना देखील महत्त्वाच्या असतात.

माधुरी नांदणीहून वनतारात गेली, तिच्यावर उपचार झाले, तिच्या परतीसाठी लोकांनी संघर्ष केला, नांदणीमध्ये तिच्यासाठी सुविधा उभारल्या गेल्या आणि अखेर ती पुन्हा आपल्या परिचित ठिकाणी परतत आहे.

या प्रवासात न्यायालय, प्रशासन, वनविभाग, मठ प्रशासन, स्थानिक नागरिक आणि विविध सामाजिक घटकांची भूमिका राहिली. त्याचबरोबर माधुरीच्या उपचारांची आणि देखभालीची जबाबदारी स्वीकारणाऱ्या वनताराचे योगदानही कृतज्ञतेने लक्षात ठेवण्यासारखे आहे.

माधुरीचे स्वागत निश्चितच भावनिक असेल. पण तिच्या स्वागतापेक्षा तिचे पुढील आयुष्य अधिक महत्त्वाचे आहे. तिला सुरक्षित निवास, योग्य आहार, सतत देखभाल आणि नियमित वैद्यकीय उपचार मिळाले, तरच तिची ही घरवापसी खऱ्या अर्थाने यशस्वी ठरेल.

माधुरीची घरवापसी ही एका हत्तीणीची परतफेड नाही; ती माणूस आणि प्राणी यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्याची आणि त्या नात्याची जबाबदारी स्वीकारण्याची कहाणी आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, पुणे.**

# बैल पोळ्याच्या शुभदिनी बिरजू पठाण यांच्याकडून सुमित्रा व गंगा 'गोमाते'चे पूजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : बैल पोळा हा शेतकरी वर्गांचा व हिंदू धर्माचा सर्वात मोठा सण असून या सणानिमित्ताने निफाडमध्ये हिंदू-मुस्लिम ऐक्य, प्रेम आणि माणुसकीचे सुंदर दर्शन घडले. निफाड येथील पशुप्रेमी बिरजूभाई पठाण यांनी आपल्या दोन गायी 'सुमित्रा' आणि 'गंगा' यांचे मनोभावे पूजन करून गोड असा पुरणपोळीचा घास भरून पोळ्याचा सण साजरा केला.





गायींप्रती असलेली माया, जिव्हाळा आणि कृतज्ञता व्यक्त करणारा हा प्रसंग अनेकांच्या मनाला स्पर्शून गेला. असून सण आणि श्रद्धा वेगवेगळ्या असल्या तरी माणुसकीची भावना सर्वांना जोडणारी असते, हे बिरजूभाईंच्या या कृतीतून अधोरेखित झाले.

**माणुसकीचा धर्म हाच सर्वांत मोठा! धर्म आहे**

धर्माच्या भिंती उभ्या करण्यापेक्षा माणुसकीचे पूल बांधणे गरजेचे आहे. एकमेकांच्या श्रद्धेचा आदर, परंपरांचा सन्मान आणि प्रेमाची भावना जपली, तर समाज अधिक सुंदर होतो. बिरजूभाई पठाण यांनी 'सुमित्रा' आणि 'गंगा' या गायींचे पूजन ही केवळ एक धार्मिक कृती नसून आपल्या गावातील सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकतेची जिवंत अनुभूती आहे.

### निफाडमधून हिंदू-मुस्लिम बांधवांनी दिला ऐक्याचा संदेश

निफाडची ओळख केवळ सण-उत्सवांमुळे नाही, तर एकमेकांच्या सुख-दुःखात उभे राहणाऱ्या माणुसकीमुळे आहे. पोळ्याच्या या पवित्र दिवशी बिरजूभाईंच्या कृतीतून समाजाला एक साधा पण मोठा संदेश मिळतो-

नावे वेगळी असली, धर्म वेगळे असले तरी माणुसकीची भाषा एकच असते आणि ती भाषा प्रेमाची असते.

अशा छोट्या-छोट्या कृतीतूनच समाजात विश्वास वाढतो, मनं जोडली जातात आणि 'एक गाव - एक परिवार' ही भावना अधिक मजबूत होते. बिरजू भाईंचे गोमातेविषयी असणारे प्रेम सर्वांना अभिमानास्पद असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

# भाळवणीत शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्‌घाटन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत इयत्ता चौथीच्या विध्यार्थीना शिष्यवृत्ती परीक्षेचे मार्गदर्शन मिळावे म्हणून केंद्र प्रमुख सतीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्यवृत्ती मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले आहे.

या केंद्राचे उदघाट्न पंचायत समिती सदस्य विजय शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.





यावेळी केंद्र प्रमुख सतीश शिंदे म्हणाले की शिष्यवृत्ती परीक्षेत या केंद्रातील विध्यार्थी नेहमी यश मिळवितात. भविष्यात या केंद्रातील अनेक विध्यार्थीना यश मिळावे म्हणून प्रत्येक रविवारी विध्यार्थीना वेगवेगळे शिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. याचा शिष्यवृत्ती परीक्षेत बसलेल्या विध्यार्थीना फायदा होणार आहे.

### राज्यातील प्रथमच प्रयोग शिष्यवृत्ती विध्यार्थीना केंद्र शाळेत मार्गदर्शन

यावेळी सरपंच रणजित जाधव, उपसरपंच नितीन शिंदे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष किशोर खरडकर, पल्लवी कोले, नागेश पाटील, कवडे, दत्ता केसकर, बापू चौगुले, रणजित इंगळे, विजय सुरपुसे, अमोल शिंदे, सोमनाथ शिंगटे, अमोल पेठकर, सागर लोखंडे, प्रशांत माळवदे, मुख्याध्यापक सुरेश शिंदे, पं. भा.गायकवाड, शिक्षक, पालक विध्यार्थी उपस्थित होते.

## स्वेरीत 'शिक्षक दिन' उत्साहात साजरा

# विद्यार्थी व शिक्षकांनी आपला कणा ताठ ठेवावा : महाराष्ट्र राज्य साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- 'माझ्या आईने मला योग्य वेळी योग्य दिशा दिली. वेळप्रसंगी तिने कान धरले. जर त्यावेळी तिने योग्य कडकपणा घेतला नसता तर आज मी आपल्या समोर उभा राहिलो नसतो, एवढी प्रगती झाली नसती. म्हणून आपली सर्वात प्रथम शिक्षक म्हणजे आई असते. साहित्य, नाटक, कलाकारी, पत्रकारीता आदी क्षेत्रात भूमिका निभावत असताना मला मनस्वी आनंद होतो. आपल्याला मनापासून जिथे आणि ज्यावेळी काम करण्याची संधी मिळते तेंव्हा अनेक गोष्टींचा त्याग करावा लागतो. अभिनय ही एक प्रकारची साधना असते. त्यामुळे प्रत्येक गोष्टीतून आपल्याला शिक्षण मिळत असते. म्हणून विद्यार्थी व शिक्षकांनी आपला कणा ताठ ठेवावा व आपले कार्य निरंतर करत रहावे' असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी केले.



गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट मध्ये मध्यवर्ती असलेल्या भव्य खुल्या रंगमंचावर भारताचे दुसरे राष्ट्रपती भारतरत्न डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची १३८वी जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजिलेल्या 'शिक्षक दिना'च्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेते, साहित्यिक, दिग्दर्शक, महाराष्ट्र राज्य साहित्य परिषदेचे अध्यक्ष, आखिल भारतीय मराठी महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण हे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र दास हे होते. महाराष्ट्र गीत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ गीत, स्वेरी गीत व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाला सुरवात झाली. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी सर्वांचे स्वागत करून प्रास्ताविकात म्हणाले की, 'विद्यार्थी दशेत असतानाच आपल्यामध्ये शिस्त व आदर रुजविणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रामाणिक परिश्रम करत आपल्या करिअरमध्ये यश मिळण्यापासून आपल्याला कोणीही रोखणार नाही. आज शिक्षकांचे महत्व हे वाढले असून ते विद्यार्थ्यांच्या यशावर अवलंबून आहे. म्हणून आज शिक्षकांपेक्षा विद्यार्थी हेच मोठे शिक्षक आहेत.' शिक्षक दिनानिमित्त कांही विद्यार्थ्यांनी आपल्या विचारातून शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. पुढे बोलताना प्रमुख पाहुणे योगेश सोमण म्हणाले की, 'पुण्यात एकदा नाटक झाल्यानंतर माझ्या अंगात इगो भिनला होता. नाटक संपल्यानंतर बाहेर पडलो तर दिडशे नागरिक वाट पाहत रांगेत उभे होते. त्यांनी माझ्या पाया पडून माझ्यातील तुकाराम महाराजांचे दर्शन घेतले कारण ते नागरीक माझ्या अभिनयातील संत तुकाराम पाहत होते. हे दृश्य पाहून माझ्यातील सर्व 'इगो' गळून पडला. तेथून मी खऱ्या अर्थाने यशाचा प्रवास सुरु केला. यातून आयुष्याला एक धडा मिळाला.' असे सांगून त्यांनी कुसुमाग्रजांच्या 'कणा' कवितेच्या माध्यमातून गुरु- शिष्याचे स्पष्टीकरण दिले. अध्यक्षीय भाषणातून साहित्यक डॉ. राजेंद्र दास म्हणाले की, 'राज्यात सर्व ठिकाणी व्याख्याने दिली परंतु स्वेरीतील या ठिकाणचा परिसर, आदर, शिस्त आणि मिळालेला प्रतिसाद पाहता हा राज्यातील सर्वात मोठा 'शिक्षक दिन' आपण साजरा करतोय. आज समाजामध्ये शिक्षकांमुळे अनेकजण घडत आहेत. जर जीवनातून शिक्षक वगळले तर समाजाचे अस्तित्व शून्य आहे. आई, वडील, पालक, गुरु यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांचे करिअर उत्तम होते. म्हणून शिक्षित होणे अत्यंत गरजेचे आहे कारण शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो घेईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेसाठी शिक्षक हजारो पावले झिजवतात. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. आंबेडकर यांसारख्या अनेक थोर माणसांचे स्मरण केले पाहिजे. 'तुम्ही होता म्हणून आम्ही आहोत' ही भावना आपल्या मनात जागृत झाली पाहिजे आणि हेच खरे संस्कार शिक्षक देत असतात. असे सांगून 'यशाच्या नशेत असताना अपयश कसे पेलावे' ही स्वरचित कविता 'सर' या कवितेतून डॉ.दास यांनी स्पष्ट केले. यावेळी शिक्षकांचा पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष कल्याण शिंदे, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन व स्वेरीच्या विश्वस्त सौ. प्रेमलता रोंगे, सचिव डॉ. सुरज रोंगे, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वस्त. बी.डी.रोंगे, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त प्रा. सी.बी.नाडगौडा, सौ. कागदे, सौ. नाडगौडा, श्रीमती वंदना रोंगे, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही.मांडवे, स्वेरी लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ.बनकर, डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, परीक्षा नियंत्रक डॉ. सतीश लेंडवे, इतर अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदी उपस्थित होते. प्रणीता व्यवहारे, सेजल ठाकूर व डॉ.नीता तळवलकर यांनी सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे जनजागृती उपक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त गुरुवारी ग्रामीण रुग्णालय, अक्कलकोट येथे जनजागृतीपर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम ाचे उद्घाटन अक्कलकोट नगरपरिषदेचे आरोग्य सभापती अविनाश मडिखांबे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मानसिक आरोग्य, आत्महत्या प्रतिबंध आणि तणावमुक्त जीवनशैली याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास ग्रामीण रुग्णालय अक्कलकोटचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक राठोड, डॉ. रवींद्र बनसोडे, डॉ. शिवा हताळे, सोलापूर जिल्हा रुग्णालयाच्या उड ऑफिस टीमम धील सुप्रिया शिवशरण, चिकित्सा मानसशास्त्रज्ञ श्री. अक्षय गुंजाळ, समाजसेवक श्री. अतुल राऊत, सम ुपदेशक, तसेच अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाच्या प्रभारी श्रीमती शीतल जाधव, छउऊ स्टाफ उज्वला फडतरे, खउढउ टेक्निशियन श्री. राघवेंद्र करजगीकर, आयुष विभागाचे डॉ. बिराजदार यांच्यासह रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक म ोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना आरोग्य सभापती अविनाश मडिखांबे म्हणाले की सध्या मानसिक आरोग्याची काळजी घेणे ही प्रत्येकाची काळाची जबाबदारी असल्याचे सांगितले. योग्य आहार, ानियमित व्यायाम, पुरेशी विश्रांती,मोबाईलचा अतिरिक्त वापर टाळणे, कुटुंबामध्ये सुसंवाद ठेवणे, व्यसनांपासून दूर राहणे, ध्यानधारणा करणे तसेच मनावर नियंत्रण ठेवून शांतता व संयम राखणे याबाबत त्यांनी विविध उदाहरणांसह मार्गदर्शन केले.

मनातील ताण आणि अडचणी एकट्याने सहन न करता आपल्या कुटुंबाला तसेच मित्रपरिवार किंवा तज्ज्ञांशी संवाद साधणे आवश्यक आहे. योग्य वेळी मिळालेली साथ आणि समुपदेशन एखाद्याचे जीवन वाचवू शकते, असा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनीही मानसिक आरोग्याचे महत्त्व, तणाव व्यवस्थापन आणि आत्महत्या प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन केले. ग्रामीण रुग्णालयातील सर्व कर्मचारी तसेच रुग्णांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राघवेंद्र करजगीकर यांनी केले आभार अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाच्या प्रभारी शितल जाधव यांनी मानले.

# पर्यावरण पूरक व ध्वनी प्रदूषण मुक्त गणेशोत्सव साजरा करा

## श्री गणेशोत्सव २०२६ अनुषंगाने बार्शी येथे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली शांतता समितीची बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री गणेशोत्सव यांच्या अनुषंगाने दिनांक १० सप्टेंबर २०२६ रोजी कोल्हापूर महाक्षेत्राची विशेष महा पोलिस निरीक्षक मा श्री संजय कुमार शर्मा यांच्या उपस्थितीत गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी शांततेच्या समितीचे सदस्य व बार्शी विभागातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली, सदर बैठकीस मा श्री पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अध- ीक्षक मा श्री विजय कबाडे व पोलीस इतर अधिकारीही उपस्थित होते.

यावेळी मा श्री विशेष पो- लीस अधीक्षक रंजनकुमार शर्मा यांनी आगामी गणेशोत्सव शांततेत व पर्यावरण पूरक व ध्वनी प्रदूषण मुक्त वाता- वरणात सादर करण्याचे आवाहन केले व शासनाने निर्धारित केलेल्या गणेश





मंडळांनी दोन्ही शेताचे व काटेकोरपणे पालन करावेछज उक्ष,छे वेश्रलू या संकल्पनेला प्राधान्य द्यावे त्याचबरोबर उत्सवाबरोबर सामाजिक सोलो का व शांतता अबाधित राहील असे अशा सूचना देण्यात आल्या, हो गणेशाच्या दरम्यान कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवता अफवा पसरून येत व सोशल मीडियावर प्रसारिहोणाऱ्याया कोणत्याही संशयात त्याच्यावर कातर जाऊन जमा करता प्रतिक्रिया देऊ नये असेही त्यांनी पोस्ट केले. त्यानंतर सोलापूर जिल्हा पोलीस कार्यालय येथे गेले ते पोलीस अधिकारी यांची स्वतंत्र बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे व संबंधित गणेश मंडळाचे सलोख्याची संबंध ठेवणे संवेदन साधने वसुली सन्मान ठेवणे. विशेष लक्ष ठेवणे व ध्वनी प्रदूषणास प्रतिबंध करणे, सोशल मीडिया व अफवांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे, तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यास आवश्यकता सूचना देणे, सामाजिक एकोपा व सामाजिक बांधिलकी आपण संबंध साधून पार पाडणे यासाठी दादाजी पालन करून पार पाडवा असे आव्हान पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.NO DJ,NO DOLBY यांची शपथ घेण्यात आली,

सदैव बैठकी करता महा पोलीस निरीक्षक कुमार शर्मा विशेष कोल्हापूर महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर, पोलीस अधीक्षक श्री अतुल जी कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक आदी उपस्थित होते.

# माधुरी हत्तीचे पुन्हा कोल्हापुरात आगमन भविष्यवाणी ठरली खरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : कोल्हापूर : कोल्हापूरकरांच्या परिचयाची आणि लाडकी असलेली 'माधुरी' हत्ती पुन्हा एकदा कोल्हापुरात दाखल झाली आहे.

अनेक जाणकारांच्या मते पहिल्यापासूनच भविष्यवाणी केलेली होती पुन्हा माधुरी येणार हे सिद्ध झालेलं होतं.

तिच्या आगमनामुळे प्राणीप्रेमी आणि नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

माधुरीच्या आगमनाची माहिती मिळताच तिची एक झलक पाहण्यासाठी नागरिकांम ध्ये उत्सुकता निर्माण झाली. तिच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक खबरदारी घेण्यात येत असून संबंधित प्रशासन आणि वन विभागाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे.

माधुरी हत्तीचा कोल्हापूरशी अस- लेला जुना संबंध असल्याने तिचे आगमन नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरले आहे. सोशल मीडियावरही तिच्या आगमनाची चर्चा सुरू झाली.

# नाशिक येथे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी राज्यातील कॉंग्रेस पदाधिकारी यांच्यासोबत चर्चा करून राजकीय परिस्थितीचा घेतला आढावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : लोकसभेतील विरोधी पक्षनेते, राहुल गांधी यांनी नाशिक येथे राज्यातील काँग्रेस पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत महाराष्ट्रातील सद्याची राजकीय परिस्थिती आणि संघटनात्मक तयारीचा सविस्तर आढावा घेतला. असुन निफाड तालुका काँग्रेस चे अध्यक्ष साहेबराव ढोमसे यांना त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. असुन विविध विषयावर चर्चा करण्यात आली

काँग्रेसचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी, तळागाळातील कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी आणि आगामी राजकीय आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध विषयांवर यावेळी सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते . विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गट नेते . सतेज ऊर्फ बंटी पाटील, मुंबई काँग्रेस अध्यक्षा खा. वर्षा गायकवाड, खा. शोभा बच्छाव, डॉ. विश्वजीत कदम,राजाराम पाटील पानगव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# सामाजिक कार्याची दखल; निंगप्पा निंबाळ यांचा सत्कार

## सिन्नूर येथे जगदीश्वरानंद महास्वामीजींच्या हस्ते गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/प्रतिनिधी : सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रमांच्या माध्यमातून योगदान देत तसेच वंचित व पीडित घटकांच्या प्रश्नांना पत्रकारितेच्या माध्यमातून वाचा फोडणारे पत्रकार निंगप्पा श्रीमंत निंबाळ यांचा सिन्नूर येथे जगदीश्वरानंद महास्वामीजी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

निंगप्पा निंबाळ हे गेल्या काही वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, सामाजिक बांधिलकी जपत विविध सामाजिक व जनजागृतीपर उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत. सामान्य नागरिकांच्या सम स्या, वंचित घटकांचे प्रश्न तसेच सामाजिक विषयांना आपल्या लेखणीच्या माध्यमातून व्यासपीठ मिळवून देण्याचे कार्य ते करीत आहेत.

पत्रकारितेबरोबरच सामाजिक क्षेत्रातही त्यांनी योगदान दिले असून, विविध महापुरुषांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन, सामाजिक जनजागृती आणि सम ाजात एकोपा निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची यावेळी दखल घेण्यात आली.

**सत्काराबद्दल निंगप्पा निंबाळ यांनी कृतज्ञता व्यक्त करत, मिळालेला सन्मान ही माझ्यासाठी प्रेरणा असून, यापुढेही समाजा- तील वंचित आणि गरजू घटकांच्या प्रश्नांसाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा प्रयत्न करणार आहे, अशी भावना व्यक्त केली.**



यावेळी जगदीश्वरानंद म हास्वामीजींनी निंबाळ यांच्या सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रा- तील कार्याचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. समाजातील दुर्बल घटकांसाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्म ान हा समाजाला सकारात्मक दिशा देणारा असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. यावेळी

सतलिंगप्पा जेवार्गी राजू हौदे आणविरंय स्वामी सिद्द- ाराम जेवर्गी निंगप्पा हौदे प्रकाश कालसगोंड जगदीश उजनी चेन्नय स्वामी शरण अंतर्गगा जगू तोळानूर संगमेश सुतार रवी जेवर्गी भुताळी कालसगोंड सुभाष उजनी सिद्धराम सोनकांबळे शिवानंद सोनकांबळे चंद्रकांत कांबळे व आदी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत वैनतेय विद्यालयाचा संघ अजिंक्य



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील वैनतेय विद्यालयाच्या मुलांच्या संघाने तालुकास्तरीय १७ वर्षे आतील कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला या संघाने सलग दुसऱ्या वर्षी तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धे त अजिंक्यपद मिळवले आहे या संघाची जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे

या स्पर्धा काकासाहेब नगर येथील के. के .वाघ इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे संपन्न झाल्या संपन्न झाल्या १७ वर्षे आतील वयोगटातील या स्पर्धेत तालुक्यातील एकूण ३२ संघांनी सहभाग घेतला होता.या स्पर्धेचा अंतिम सामना वैनतेय विद्यालय, निफाड आणि पिं- पळगाव कॉलेज या दोन संघांम ध्ये झाला वैनतेय विद्यालयाने पिंपळगाव कॉलेज संघावर ११ गुणांच्या फरकाने विजय मि ळवत प्रथम क्रमांकाचे विजेतेपद पटकावले.

विजेत्या संघात

पार्थ शिंदे, साईधन काळे, दक्ष शिंदे, मंथन शिंदे, राम भगरे, श्लोक धारराव, प्रणव परिहार, कृष्णा शिंदे, साई सांगळे, ओम गायकवाड, अंश कायस्थ आणि समर्थ जावरे. या खेळाडूंचा समावेश होता विजयी संघाला साहिल शेख यांचे मार्गदर्शन लाभले, यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा.व्यवहारे संस्थेचे विश्वस्त रतन पाटील वडघुले,किरण कापसे, राजेंद्र राठी, अँड दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत विश्वास कराड, नरेंद्र नांदे, प्राचार्या मनीषा गुजराथी, उपप्राचार्या रंजना लाहोटी, पर्यवेक्षक बी.बी गुंजाळ, पर्यवेक्षक सी आर जाधव यांनी अभिनंदन केले.

**गणेशोत्सव मिरवणूक पारंपरिक वाद्यांच्या गजरात साजरी करा**

**उपविभागीय अधिकारी अर्जुन ठोसरे यांचे आवाहन**

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अंढेरा पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : देऊळगाव राजा तालुक्यातील सर्वात मोठे पोलीस स्टेशन असलेले अंढेरा पोलीस स्टेशनला येत्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि उत्सव शांततेत पार पडावा, या उद्देशाने अंढेरा पोलीस ठाण्यात शांतता समिती व गणेश मंडळ पदाधिकारी, आणि पोलीस स्टेशन हद्दीत येत असलेल्या सर्वच गावातील पोलीस पाटील,सरपंच व गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत बोलताना गणेशोत्सव हा लोकवर्गणीतून साजरा होण- ारा सामाजिक सण आहे. त्याम ुळे मिरवणुकांमध्ये डीजेऐवजी पारंपरिक वाद्यांचा वापर करून सण उत्साहात व शांततेत साजरा करावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी अर्जुन ठोसरे यांनी केले.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी अर्जुन ठोसरे हे होते.याप्रसंगी अंढेरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार श्री.रुपेश शक्करगे समितीचे सदस्य,विविध गावांतील पोलीस पाटील,सरपंच,लोकप्रतिनिधी, पत्रकार आणि गणेश मंडळांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उप- स्थित होते.गणेशोत्सवा दरम्यान सर्व धर्मीय नागरिकांनी एकत्र येऊन सामाजिक सल- ोखा जपत गणेशोत्सव साजरा करावा.बैठकीच्या शेवटी अंढेरा पोलीस ठाण्याच्या वतीने उप- स्थित सर्व मान्यवर,शांतता समि ती सदस्य व गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानण्यात आले.उत्सवाच्या काळात पो- लीस प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन बैठकीस उपस्थित असलेले सर्व गावा- तील पोलीस पाटील,सरपंच व गणेश मंडळाचे पदाधिकाऱ्यांनी दिले.



**बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे व सूचना**

ध्वनी प्रदूषणाचे नियम पाळून पारंपरिक वाद्यांच्या (ढोल-ताशा) गजरातच विसर्जन मिरवणुका काढाव्यात. डीजेचा वापर पूर्णपणे टाळावा.

अफवांवर विश्वास ठेवू नका

सोशल मीडियावर येणाऱ्या कोणत्याही आक्षेपार्ह किंवा संशयास्पद संदेशांवर विश्वास न ठेवता, अशी कोणतीही माहिती आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा.

# बार्टी संस्थेमार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२५

**उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखत परीक्षा तयारी करिता आर्थिक सहाय्य देणेबाबत आर्थिक सहाय्य योजना**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे,मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखत परीक्षा तयारी करिता एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुलाखत परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. ५,०००/- एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखत परीक्षेच्या तयारीसाठी आर्थिक सहाय्य देणेबाबत घोषित केले आहे. सदर निकालानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपत्रित गट-ब परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखत परीक्षा तयारी करिता पात्र असलेल्या उमेदवारांना एकरक्कमी रक्कम रु. ५,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थे मार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in > NOTICEBOARD > Maharashtra Public Service Commission Group-B interview 2025 येथे भेट द्यावी.

# अक्कलकोटच्या दुष्काळी स्थितीच्या पाहणीसंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा !

## आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दिले विविध मागण्यांचे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी दुष्काळी परिस्थितीसंदर्भात प्रत्यक्ष पाहणीचे निर्देश प्रशासनाला दिले असून आज या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी श्री. एस. कार्तीकेय यांच्याशी सविस्तर चर्चा केली. आपल्या अक्कलकोट विधानसभा क्षेत्रात यंदा पावसाचे प्रमाण अत्यंत कमी राहिल्याने अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यातच तालुक्यातील विविध जलप्रकल्पांमध्येही अपेक्षित पाणीसाठा उपलब्ध नसल्याने शेती, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. या पार्श्वभूमीवर मा. देवेंद्रजींच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासनाने दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करुन सदर अहवाल सादर करावा याबाबत जिल्हाधिकाऱ्यांसमवेत विविध मुद्दे चर्चिले.




अक्कलकोट तालुक्यातील दुष्काळी स्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून अहवालानंतरची परिस्थिती लक्षात घेत अक्कलकोट मतदारसंघ दुष्काळग्रस्त घोषित करावा आणि दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना तातडीने सुरू कराव्यात, याबाबतही जिल्हाधिकारी श्री. एस. कार्तीकेयन यांच्यासमवेत संवाद झाला.

या गंभीर परिस्थितीमुळे पिण्याच्या पाण्याचे नियोजन, टँकरद्वारे पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा-पाण्याची व्यवस्था आणि शेतकऱ्यांना आवश्यक मदत याबाबत प्रशासनाने वेळीच पावले उचलणे गरजेचे आहे. परिस्थिती आणखी गंभीर होण्याची वाट न पाहता नागरिक, शेतकरी आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी तातडीने निर्णय घ्यावेत, अशीही मागणी यावेळी केली आहे.

# श्रावण शुक्रवार व गोकुळ अष्टमी निमित्त श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेस पारंपरिक अलंकार परिधान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्रावण शुक्रवार व गोकुळ अष्टमी निमित्त श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेस पारंपरिक अलंकार परिधान,

श्री. विठ्ठल व रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेस आकर्षक, पारंपरिक सुवर्ण अलंकार परिधान करण्यात आले. या पारंपरिक अलंकारांमुळे श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेचे विलोभनीय रूप पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.

श्री विठ्ठलाससोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, मोत्यांचा तुरा, दंडपेठ जोड, हिऱ्याची कंगन जोड, जवेची माळ, पैंजण जोड, शिरपेच मोठा, मत्स्य जोड, मोठे बोरमाळ, अष्टपैलू मण्याची कंठी, तोडे जोड, चंद्रहार, तुळशीची माळ, एकदानी, पदकास लॉकेट इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

श्री रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, ताणवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमनी पदक, जवेच्या माळा,लक्ष्मी हार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले. याबाबतची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी दिली.

# मंगरूळ येथे मराठा आरक्षणासाठी भव्य रास्ता रोको; कळंब-डोकी महामार्ग तासभर ठप्प



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या प्रमुख मागणीसाठी कळंब तालुक्यातील मंगरूळ पाटी, कळंब-डोकी रोड येथे आज सकल मराठा समाजाच्या वतीने भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील मराठा आरक्षण लढ्याला पाठिंबा दर्शवण्यासाठी मंगरूळ व परिसरातील शेकडो मराठा बांधव हातात भगवे झेंडे घेऊन रस्त्यावर उतरले होते. एक मराठा लाख मराठा आणि आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं अशा जोरदार घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

**यावेळी प्रमुख उपस्थिती –**

या रास्ता रोको आंदोलनाचे नेतृत्व श्री. बाळासाहेब काळे, अमृत काका जाधव, गणेश भोसले यांनी केले. यावेळी प्रमुख म्हणून सुदर्शन माने, पुरुषोत्तम रिता पुरी, अरुण जाधव, भैय्या ढोणे, सुनील भराडे यांच्यासह मंगरूळ, कळंब, डोकी परिसरातील शेकडो तरुण व ज्येष्ठ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

आंदोलकांनी सांगितले की, जोपर्यंत मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र व ओबीसीतून आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत हा लढा थांबणार नाही.

**पोलीस प्रशासनाचा चोख बंदोबस्त –**

आंदोलन शांततेत व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शिराढोण पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. राम घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. चोपने साहेब, श्री. सातपुते साहेब व त्यांच्या पथकाने मोठा बंदोबस्त ठेवला होता. पोलिसांनी आंदोलकांशी चर्चा करून आंदोलन शांततेत पार पाडले.

शेवटी पोलिस प्रशासनामार्फत शासनाला निवेदन देण्यात आले आणि रास्ता रोको मागे घेण्यात आला. या आंदोलनामुळे कळंब-डोकी रोडवरील वाहतूक सुमारे एक तास ठप्प झाली होती.

## जलजीवन मिशन नळ योजना झापुकझूपुक...!

# पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी : नागरिकांचा संताप, महिलांचा आक्रोश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी/बाराभाटी : जवळच्या खांबी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जवळपास ३० गावांचा पाणीपुरवठा केला जातो. मागील अनेक वर्षांपासून सुरू असलेली ही योजना अचानक बंद पडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. म्हणून ही योजना ठरली जलजीवन मिशन नळ योजना झापुकझूपुक...!

दि. १ सप्टेंबरपासून नळाला पाणी येणे बंद झाल्याने बोळदे, कवठा, सुकळी, खैरी, बाराभाटी, येरवडा या गावासह इतर गावांतील नागरिकांना पाण्यासाठी मोठी पायपीट करत असून विशेषतः महिला, वृद्ध आणि लहान मुलांना खूपच त्रास सहन करावा लागत आहे. नळधारक रुपये २०० पर्यंतची पाणीपट्टी भरण्यास तयार असतानाही पाणीपुरवठा अचानक बंद करणे हा नागरिकांवर अन्याय आहे. पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असून, जलजीवन मिशनचा उद्देश प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचवणे हा आहे. मात्र प्रत्यक्षात नळाला पाणीच मिळत नसल्याने या योजनेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

नळधारक पैसे भरण्यास तयार आहेत. मात्र पाणीच मिळत नसेल तर नागरिकांनी कुठे जावे? महिलांच्या डोक्यावर पुन्हा हंडे येण्याची वेळ येऊ नये. प्रशासनाने तातडीने पाणीपुरवठा सुरू करावा. याबाबत ग्रामपंचायत सदस्य धम्मदीप मेश्राम यांनी विभागाची तातडीने दखल घेऊन खांबी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी केली आहे.

**महिला करणार पाणी आंदोलन**

बोळदे, कवठा, सुकळी, खैरी, बाराभाटी, येरंडी या भागातील महिला आणि नागरिक पाण्यासाठी त्रस्त झाले आहेत. विशेषतः महिलांना पाण्यासाठी दूरवर भटकंती करावी लागते. अशा गंभीर समस्येने परीसरातील महिला पाणी आंदोलन करणार असल्याचे लोकमतशी बोलल्या.

**लक्ष्मणराव धनवडे 'तात्या' यांच्या वाढदिवसानिमित्त आज विविध सामाजिक उपक्रम**

# वाढदिवसाचा जल्लोष नाही, सेवाकार्याचा संकल्प!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुंगत । प्रतिनिधी : भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र राज्याचे परिषद सदस्य, कर्मयोगी सुधारकपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक मा. लक्ष्मणराव धनवडे (तात्या) यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. वाढदिवस केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता समाजातील विविध घटकांना प्रत्यक्ष मदतीचा हात देण्याचा प्रयत्न या उपक्रमांच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

नारायण चिंचोली व भैरवनाथवाडी परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमांमध्ये धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक तसेच पर्यावरणपूरक उपक्रमांचा समावेश आहे. त्यामुळे धनवडे यांच्या वाढदिवसानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमांना सामाजिक बांधिलकीची जोड मिळाली आहे.

कार्यक्रमाची सुरुवात श्री. सूर्यनारायण अभिषेक व महाआरतीने होणार आहे. त्यानंतर विविध जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. नारायण चिंचोली, भैरवनाथवाडी आणि धुपे वस्ती येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य तसेच स्टीलच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

याशिवाय उज्जनी वसाहत येथील जिल्हा परिषद शाळेत टिफिन डबे व खाऊ वाटप, केंद्र शाळा पडवर्धन-कराळी येथे शालेय साहित्य व खाऊ वाटप, तसेच नाईक नवरे वस्ती येथील जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात येणार आहे.

नरसिंहवाडी जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्याचे वाटप, तर चिंचकर वस्ती जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना ट्रॅकसूट व खाऊचे वाटप करण्याचे नियोजन आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाल्याने त्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यास हातभार लागणार आहे.

सामाजिक बांधिलकीचा आणखी एक भाग म्हणून रामकृष्णहरी वृद्धाश्रम, पंढरपूर येथे मिष्टान्न भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसोबत वाढदिवस साजरा करून त्यांना आपुलकीचा सहवास देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत भैरवनाथवाडी येथे वृक्षारोपण कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे. तसेच भैरवनाथवाडी येथील अंगणवाडीला इलेक्ट्रिक फॅन देण्यात येणार आहे.

या सर्व उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, ज्येष्ठ नागरिकांना मिष्टान्न भोजन, अंगणवाडीला आवश्यक सुविधा आणि पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण अशा विविध स्तरांवर सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

१२ सप्टेंबरला सेवाकार्याची विविधांगी पर्वणी

धनवडे 'तात्या' यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये शालेय साहित्य वाटप, स्टीलच्या पाण्याच्या बाटल्या, टिफिन डबे, ट्रॅकसूट, खाऊ वाटप, वृद्धाश्रमातील मिष्टान्न भोजन, वृक्षारोपण आणि अंगणवाडीला इलेक्ट्रिक फॅन अशा उपक्रमांचा समावेश असल्याने वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्याचा संदेश यातून देण्यात आला आहे.

मा. लक्ष्मणराव धनवडे (तात्या) मित्र परिवार व पांडुरंग परिवार, नारायण चिंचोली व भैरवनाथवाडी यांच्या सौजन्याने या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील नागरिक, कार्यकर्ते व हितचिंतकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



**स्वागतासाठी हार-तुरे, पुष्पगुच्छांऐवजी अन्नछत्र व गोशाळेस देणगी द्यावी** | **कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांचे आवाहन**

# कक्ष अधिकारी श्रीकांत यादव यांनी स्वीकारला कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरच्या आस्थापनेवरील कार्यकारी अधिकारी पदावर मंत्रालयीन अधिकारी श्री. श्रीकांत यादव, कक्ष अधिकारी यांची शासनाने प्रतिनियुक्तीवर नियुक्ती केली असून, त्यांनी नुकताच मंदिर समितीच्या कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.

श्री. यादव यांनी मंत्रालयातील विविध विभागांमध्ये कक्ष अधिकारी म्हणून कामकाज केले असून, ते मूळचे वैराग, ता. बार्शी येथील रहिवासी आहेत. यापूर्वी



कार्यकारी अधिकारी पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेले उपजिल्हाधिकारी राजेंद्र शेळके यांचा तीन वर्षांचा प्रतिनियुक्ती कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांचा कार्यभार संपुष्टात आला. त्यानंतर शासनाने यादव यांची मंदिर समितीच्या कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्ती केली आहे. मंदिर समितीच्या आस्थापनेवर कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापक व लेखाधिकारी ही तीन पदे शासन स्तरावरील आहेत.

यादव यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर मंदिर समितीचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे स्वागत करण्यासाठी भेटी दिल्या जात आहेत. यावेळी अनेकांकडून हार, पुष्पगुच्छ व सत्काराचे साहित्य आणले जात आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी स्वागतासाठी हार-तुरे व पुष्पगुच्छ आणण्याऐवजी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या अन्नछत्रासाठी तसेच गोशाळेसाठी देणगी स्वरूपात योगदान समक्ष भेटून द्यावे, असे आवाहन केले आहे.

सत्कारापेक्षा सेवा महत्त्वाची आहे. हार-तुरे व पुष्पगुच्छांवर होणारा खर्च अन्नछत्र किंवा गोशाळेसाठी दिल्यास त्याचा लाभ भाविक, वारकरी तसेच गोमातांच्या सेवेसाठी होईल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

कार्यभार स्वीकारल्यानंतर यादव यांनी औपचारिक स्वागत सत्काराला अधिक वेळ न देता मंदिर समितीच्या प्रशासकीय कामकाजाला प्राधान्य दिले आहे. त्यांनी मंदिर समितीच्या विविध विभागांचा दैनंदिन आढावा घेण्यास सुरुवात केली असून, संबंधित विभागांच्या कामकाजाची माहिती, प्रलंबित विषय, उपलब्ध सुविधा तसेच प्रशासनासमोरील विविध बाबींचा आढावा घेतला जात आहे. मंदिर समितीचे प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक, शिस्तबद्ध आणि भाविकाभिमुख पद्धतीने चालविणे, तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात येणाऱ्या लाखो भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे, यास प्राधान्य देण्याची भूमिका त्यांच्या कार्यपद्धतीतून दिसून येत आहे.

# एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर: गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने वाखरी, पंढरपूर येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना लाल मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कल्पकतेला आणि कलागुणांना वाव देत विविध आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या.



या शिबिरासाठी प्रशालेचे कलाशिक्षक संतोष देशपांडे, पुंडलिक अंकुशराव आणि मुकेश जमादार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांसमोर प्रत्यक्ष गणेशमूर्ती तयार करून दाखवत मूर्ती निर्मितीची विविध तंत्रे समजावून सांगितली. या उपक्रमावेळी शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचे महत्त्व पटवून देताना 'सध्याच्या काळात विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाची जाणीव करून देण्यासाठी अशा प्रकारच्या प्रात्यक्षिक आणि कृतीशील शिबिरांची नितांत गरज असल्याचे सांगितले.'

शाडूची किंवा लाल मातीची गणेशमूर्ती वापरल्यामुळे विसर्जनानंतर जलप्रदूषण कमी होण्यास मदत होते आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यास हातभार लागतो. तसेच लाल मातीमध्ये तुळशीच्या बिया मिसळून गणेशमूर्ती तयार केल्यास विसर्जनानंतर त्यापासून रोप तयार होऊ शकते. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण रक्षणाची जाणीव निर्माण करण्याचा अभिनव संदेश देण्यात आला.